www.newsdanka.com

राष्ट्रवादाचा बुलंद आवाज

न्यूज डंका महाराष्ट्र

मुंबई । पुणे । नाशिक जिल्ह्यात एकाच वेळी वितरित होणारे दैनिक

आर.एन.आय. रजिस्ट्रेश क्र. : MAHMAR/2022/83413

मुंबई | शनिवार, ७ नोव्हेंबर २०२६ >> वर्ष ५ >> अंक १८४ >> पाने ६ >> किंमत ५ रुपये | मुख्य संपादक : दिनेश कानजी

संपादकीय

काँग्रेसला रिजिम चेंज हवाय... हा घ्या पुरावा!

>> पान...२

सेन्सेक्स ८० हजारपार

ऐन दिवाळीत गुंतवणूकदारांना खुषखबर

टीम न्यूज डंका महाराष्ट्र
newsdanka@gmail.com

मार्च महिन्यात पश्चिम आशियातील युद्धाच्या झळा भारतीय शेअर बाजारालाही बसल्या होत्या. एकेकाळी ८० हजारांच्या वर व्यवहार करणारा सेन्सेक्स घसरून मार्चअखेरीस ७१,९४८ अंकांपर्यंत खाली आला होता. मात्र, त्यानंतर बाजाराने जोरदार पुनरागमन करत पुन्हा ८० हजारांचा टप्पा गाठला आहे. भारतीय शेअर बाजाराने तेजीचा नवा इतिहास रचला आहे. शुक्रवारी बाजारात खरेदीचा जोर कायम राहिल्याने आज दिवसाअखेर सेन्सेक्स १,७१८ अंकांनी वाढून ८१,०२८वर बंद झाला, तर निफ्टीचा निर्देशांक ४९३ अंकांनी वाढून २५,०३०वर बंद झाला. या तेजीच्या पार्श्वभूमीवर भारतीय शेअर बाजारातील सूचीबद्ध कंपन्यांचे एकूण बाजारमूल्य ५०२ लाख कोटी रुपयांच्या पुढे पोहोचले आहे. विशेष म्हणजे, भारतीय कंपन्यांचे हे बाजारमूल्य पाकिस्तानच्या एकूण जीडीपीपेक्षा तब्बल १३ पट अधिक आहे. जागतिक बँकेच्या आकडेवारीनुसार, पाकिस्तानचा २०२५ मधील जीडीपी सुमारे ४०७ अब्ज डॉलर म्हणजेच जवळपास ३८ लाख कोटी रुपये होता. त्याच्या तुलनेत भारतीय कंपन्यांचे ५०२ लाख कोटी रुपयांचे बाजारमूल्य भारतीय शेअर बाजाराची प्रचंड व्याप्ती आणि ताकद अधोरेखित करते.

अर्थात, बाजारमूल्य आणि जीडीपी हे आर्थिक मोजमापाचे दोन वेगवेगळे निकष आहेत.



जगात मात्र घसरण

जगातील अनेक प्रमुख शेअर बाजारांमध्ये घसरणीचे वातावरण असताना भारतीय बाजाराने मात्र दमदार कामगिरी केली आहे. अमेरिकेतील तंत्रज्ञान कंपन्यांबाबत वाढलेली चिंता, कृत्रिम बुद्धिमत्तेवरील संभाव्य निर्बंध आणि जागतिक आर्थिक अनिश्चिततेमुळे अमेरिकेतील नॅस्डॅक, दक्षिण कोरियातील कोस्पी आणि तैवानमधील ताइएक्स या निर्देशांकांमध्ये घसरण झाली. काही बाजारांमध्ये ही घसरण सहा टक्क्यांपर्यंत पोहोचली. मात्र, भारतीय बाजारात लार्जकॅप कंपन्यांच्या समभागांना गुंतवणूकदारांनी पसंती दिली. कंपन्यांचे मजबूत आर्थिक निकाल, उत्पन्नातील वाढ आणि आकर्षक मूल्यांकनामुळे मोठ्या कंपन्यांमध्ये गुंतवणुकीचा ओघ वाढला आहे. गेल्या पाच व्यवहार सत्रांमध्ये सेन्सेक्स आणि निफ्टी या दोन्ही प्रमुख निर्देशांकांनी जवळपास सहा टक्क्यांची वाढ नोंदवली आहे.

भारतीय शेअर बाजारातील या ऐतिहासिक तेजीमागे परदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांची वाढती खरेदी महत्त्वाची ठरली आहे. गेल्या पाच व्यवहार सत्रांमध्ये परदेशी गुंतवणूकदारांनी भारतीय बाजारात तब्बल ३५ हजार ७८१ कोटी रुपयांच्या समभागांची खरेदी केली आहे. विशेष म्हणजे, मागील व्यवहार सत्रातच त्यांनी १४ हजार ७९६ कोटी रुपयांची निव्वळ खरेदी केली. गेल्या सहा वर्षांतील एका दिवसातील ही सर्वात मोठी परदेशी गुंतवणूक ठरली आहे. परदेशी गुंतवणूकदारांचा भारतीय बाजारावरील वाढता विश्वास आणि देशांतर्गत कंपन्यांचे अपेक्षेपेक्षा चांगले तिमाही निकाल यामुळे बाजारातील सकारात्मक वातावरण अधिक मजबूत झाले आहे.

नेतान्याहूंचा पत्ता कट?

आयझेनकोट शपथविधीच्या तयारीत

टीम न्यूज डंका महाराष्ट्र
newsdanka@gmail.com



इस्रायलमध्ये सत्तापेच गुंतागुंतीचा बनला आहे. इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांचे प्रमुख राजकीय प्रतिस्पर्धी गादी आयझेनकोट यांना सरकार स्थापन करण्यासाठी बहुमताचा पाठिंबा मिळाल्याचे चित्र निर्माण झाले आहे. गुरुवारी (५ नोव्हेंबर) अरबबहुल संयुक्त यादीने (जॉइंट लिस्ट) आयझेनकोट यांच्या उमेदवारीला अधिकृत पाठिंबा जाहीर केला. त्यामुळे इस्रायलमधील सत्तास्थापनेच्या राजकीय घडामोडींना नवे वळण मिळाले आहे. मात्र, आयझेनकोट आणि त्यांच्या मित्रपक्षांनी अरब पक्षांकडून मिळालेला हा पाठिंबा स्वीकारणार की नाही, याबाबत अद्याप स्पष्ट भूमिका मांडलेली नाही. यापूर्वी अरब नेतृत्वाखालील आणखी एक पक्ष असलेल्या राम (Ra'am) पक्षानेही माजी लष्करप्रमुख आयझेनकोट यांना पाठिंबा देण्याची तयारी दर्शवली होती.

इस्रायलचे राष्ट्राध्यक्ष आयझॅक हर्झोग यांनी गुरुवारी सांगितले की, २७ ऑक्टोबर रोजी झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर निर्माण झालेला सत्तास्थापनेचा पेच अद्याप सुटलेला नाही. मात्र, येत्या रविवारी सरकार स्थापनेसाठी एका उमेदवाराची नियुक्ती केली जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

>> पान...५वर

टीम न्यूज डंका महाराष्ट्र
newsdanka@gmail.com

पश्चिम बंगालमधील हुगळी जिल्ह्यातील चकदह गावात स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदाच वीज पोहोचली आहे. तब्बल ७९ वर्षांनंतर गावात वीज आल्याने सुमारे ४०० आदिवासी कुटुंबांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. यंदाची दिवाळी या कुटुंबांसाठी विशेष ठरणार असून, अनेक वर्षांपासून अंधारात असलेल्या घरांमध्ये आता विजेचा प्रकाश पोहोचणार आहे.

स्वातंत्र्यानंतर पश्चिम बंगालमध्ये कम्युनिस्ट, तृणमूल अशा अनेक पक्षांची सरकारे आली. वर्षानुवर्षे सत्तेत राहूनही चकदह गावातील ४०० आदिवासी कुटुंबांच्या घरांपर्यंत वीज पोहोचू शकली नव्हती. अनेक पिढ्यांनी विजेच्या प्रतीक्षेतच आयुष्य काढले. मात्र, आता शुभेंदू अधिकारी यांच्या नेतृत्वाखालील भाजप सरकारच्या

तब्बल ७९ वर्षांनी वीज आल्यामुळे बंगालच्या गावात दिवाळी



काळात गावात पहिल्यांदाच वीज पोहोचली आहे. त्यामुळे तब्बल ७९ वर्षांनंतर गावकऱ्यांच्या घरात प्रकाश उजळणार आहे. आजवर अंधारात दिवाळी साजरी करणाऱ्या या कुटुंबांना यंदा खऱ्या अर्थाने प्रकाशाचा सण साजरा करता येणार आहे.


चकदह गाव हे तारकेश्वर विधानसभा मतदारसंघातील अष्टारदत्तपूर ग्रामपंचायतीच्या अंतर्गत येते. स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, काही वर्षांपूर्वी गावात विजेचे खांब उभारण्यात आले होते. मात्र, त्यावर वीजवाहिन्या टाकण्यात आल्या नव्हत्या. त्यामुळे खांब उभे असूनही गावकऱ्यांना वीज मिळू शकली नव्हती. गावात वीज नसल्यामुळे सर्वाधिक अडचणी विद्यार्थ्यांना सहन कराव्या लागत होत्या. रात्रीच्या वेळी अभ्यास करणे मुलांसाठी कठीण होते.

>> पान...५वर

पश्चिम बंगालमध्ये १,१५० जिलेटिन कांड्या, ९८९ डेटोनेटर्ससह २१ शस्त्रे जप्त

टीम न्यूज डंका महाराष्ट्र
newsdanka@gmail.com

बीरभूम, पश्चिम वर्धमान जिल्ह्यांत एसटीएफची कारवाई



पश्चिम बंगालमध्ये अवैध स्फोटके आणि शस्त्रसाठ्याविरोधात पोलिसांच्या विशेष कृती दलाने (एसटीएफ) मोठी कारवाई केली आहे. बीरभूम आणि पश्चिम वर्धमान जिल्ह्यांत दोन स्वतंत्र ठिकाणी छापे टाकून १,१५० जिलेटिन कांड्या, ९८९ डेटोनेटर्स, सुमारे ९,९०० मीटर डेटोनेटिंग कॉर्ड आणि २१ बेकायदा बंदुका जप्त करण्यात आल्या आहेत. या कारवाईत स्फोटकांच्या साठ्याप्रकरणी दोन जणांना ताब्यात घेण्यात आले असून, शस्त्रसाठ्याप्रकरणीही तपास सुरू आहे.

पहिली कारवाई बीरभूम जिल्ह्यातील मुरारई पोलीस ठाण्याच्या हद्दीतील बारुआ गोपालपूर गावात करण्यात आली.

>> पान...५वर

महाराष्ट्राच्या मतदारांना पुन्हा संधी

टीम न्यूज डंका महाराष्ट्र
newsdanka@gmail.com


मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षण अर्थात एसआयआर प्रक्रियेत ज्यांची नावे प्रारूप मतदार यादीतून वगळण्यात आली आहेत, त्यांच्यासाठी निवडणूक आयोगाने पुन्हा संधी उपलब्ध करून दिली आहे. महाराष्ट्रासह सात राज्यांमधील अशा मतदारांना अंतिम मतदार यादीत नाव समाविष्ट करून घेण्यासाठी नव्याने अर्ज करता येणार आहे. अनुपस्थित, स्थलांतरित, मृत किंवा दुबार नोंदणी अशा कारणांमुळे ज्यांची नावे वगळण्यात आली आहेत, त्यांना या निर्णयाचा लाभ मिळणार आहे. मतदारांना पुन्हा नोंदणीची संधी मिळावी आणि पात्र नागरिक मतदानाच्या अधिकारापासून वंचित राहू नयेत, हा या निर्णयामागील उद्देश आहे.

निवडणूक आयोगाने संबंधित राज्यांच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना यासंदर्भात निर्देश दिले आहेत. वगळण्यात आलेल्या मतदारांची बूथनिहाय यादी मतदान केंद्रे, ग्रामपंचायत आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्यालयांमध्ये प्रसिद्ध केली जाणार आहे.

>> पान...५वर

'रामायण'चा पहिल्या दिवशी ६५ कोटींचा धमाका

टीम न्यूज डंका महाराष्ट्र
newsdanka@gmail.com



नमित मल्होत्रा निर्मित 'रामायण पार्ट १' हा बहुप्रतीक्षित चित्रपट गुरुवारी अखेर चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित झाला. प्रदर्शनाच्या पहिल्याच दिवशी चित्रपटाला प्रेक्षकांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाला असून, बॉक्स ऑफिसवरही त्याने दमदार सुरुवात केली आहे. पहिल्या दिवशी देशभरातील २५ हजार २०० शोमधून या चित्रपटाने ६४.८५ कोटी रुपयांची कमाई केली. त्यामुळे चित्रपटाची भारतातील निव्वळ कमाई ६४.८५ कोटी रुपये, तर एकूण ढोबळ कमाई ७७.५० कोटी रुपयांवर पोहोचली आहे. जागतिक स्तरावर या चित्रपटाने १५५ कोटींची कमाई केली आहे.

'रामायण'च्या पहिल्या दिवसाच्या कमाईत हिंदी आवृत्तीचा सर्वाधिक वाटा आहे. हिंदी भाषेतील २० हजार ६७८ शोमधून चित्रपटाने ४७.५० कोटी रुपयांची कमाई केली. त्यानंतर कन्नड आवृत्तीने १ हजार १९७ शोमधून ७.२५ कोटी रुपये, तर तेलुगू आवृत्तीने १ हजार ७७६ शोमधून ६ कोटी रुपयांची कमाई केली. तमिळ आवृत्तीने ९९२ शोमधून २.६० कोटी रुपये, तर मल्याळम आवृत्तीने ५५७ शोमधून १.५० कोटी रुपयांचा गल्ला जमवला.

>> पान...३वर

नाशिक टीसीएस धर्मांतर प्रकरणात इम्तियाज जलील यांच्यावर गुन्हा

टीम न्यूज डंका महाराष्ट्र
newsdanka@gmail.com



नाशिकमधील टीसीएस धर्मांतर आणि लैंगिक शोषण प्रकरणानंतर राज्यात खळबळ उडाली होती. या प्रकरणात आता नवी माहिती समोर आली असून एमआयएमचे नेते आणि माजी खासदार इम्तियाज जलील यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नाशिक पोलिसांनी ही कारवाई केली आहे. या प्रकरणातील मुख्य आरोपी निदा खान हिला आश्रय दिल्याच्या आरोपावरून ही कारवाई करण्यात आली आहे. विशेष तपास पथकाच्या (एसआयटी) तपासात इम्तियाज जलील यांच्याविरोधात पुरावे आढळल्यानंतर पोलिसांनी हे पाऊल उचलल्याची माहिती समोर आली आहे. यापूर्वी एमआयएमचे नगरसेवक मतीन पटेल यांच्यावरही निदा खानला आश्रय दिल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला होता.

प्रकरणाच्या तपासादरम्यान मतीन पटेल यांच्या मोबाईल फोनमध्ये काही संभाषणांच्या रेकॉर्डिंग आढळल्याची माहिती समोर आली आहे. या रेकॉर्डिंगच्या आधारे इम्तियाज जलील यांच्या कथित सहभागाची चौकशी करण्यात आली. पोलिसांनी जलील यांचा जबाबही नोंदवला असून त्यांचा आवाज नमुनाही घेण्यात आल्याचे वृत्त आहे. या रेकॉर्डिंगमधील आवाज आणि इतर पुराव्यांची तपासणी एसआयटीकडून करण्यात आली. त्यानंतर त्यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे.

दरम्यान, निदा खान फरार असताना तिला छत्रपती संभाजीनगरमध्ये आश्रय दिल्याचा आरोप मतीन पटेल यांच्यावर झाला होता. पोलिसांच्या तपासानुसार, निदा खान आणि तिच्या कुटुंबीयांना पटेल यांनी राहण्यासाठी जागा उपलब्ध करून दिली होती. चौकशीदरम्यान निदाच्या ठावठिकाणाबाबत विचारले असता पटेल यांनी वारंवार इम्तियाज जलील यांचे नाव घेतल्याचा उल्लेख यापूर्वी दाखल झालेल्या आरोपपत्रातही करण्यात आला होता.

NEWS डंका
राष्ट्रवादाचा बुलंद आवाज

'न्यूज डंका'चे तीन
दसरा दिवाळी २०२६
विशेषांक



तज्ञ आणि संशोधकांच्या लेखणीतून उतरलेले दर्जेदार लेख.

आजच आपल्या प्रतीची नोंदणी करा.

संपर्क : ९९६७७७२०००

भारताच्या शिरपेचात मानाचा तुरा

महाभारत, अर्थशास्त्र, राजतरंगिणीची युनेस्कोच्या 'मेमरी ऑफ द वर्ल्ड'मध्ये नोंद

टीम न्यूज डंका महाराष्ट्र
newsdanka@gmail.com



२०२४ मध्ये तीन ग्रंथांचा झाला होता समावेश

यापूर्वी २०२४ मध्ये रामचरितमानस, पंचतंत्र आणि साहित्यशास्त्राशी संबंधित सहृदयालोक-लोचन या ग्रंथांचाही याच प्रादेशिक नोंदवहीत समावेश झाला होता. त्यामुळे आता भारतातील एकूण नोंदींची संख्या सहा झाली आहे. युनेस्कोने १९९२ मध्ये सुरू केलेल्या 'मेमरी ऑफ द वर्ल्ड' कार्यक्रमाचा उद्देश ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि बौद्धिकदृष्ट्या महत्त्वाच्या दस्तऐवजांचे जतन करणे आणि ते भावी पिढ्यांसाठी उपलब्ध करून देणे हा आहे.

भारताच्या प्राचीन साहित्यिक, ऐतिहासिक आणि बौद्धिक वारशाला आंतरराष्ट्रीय स्तरावर मोठी मान्यता मिळाली आहे. महाभारत, कौटिल्य अर्थशास्त्र आणि काश्मीरचा इतिहास सांगणाऱ्या राजतरंगिणी या तीन महत्त्वपूर्ण ग्रंथांच्या हस्तलिखितांचा युनेस्कोच्या 'मेमरी ऑफ द वर्ल्ड' आशिया-पॅसिफिक प्रादेशिक नोंदवहीत समावेश करण्यात आला आहे. इंडोनेशियातील जकार्ता येथे झालेल्या या नोंदवहीच्या ११व्या अधिवेशनात हा निर्णय घेण्यात आला. या मान्यतेमुळे या प्रादेशिक नोंदवहीत भारताच्या नोंदींची संख्या सहावर पोहोचली आहे.

केंद्रीय संस्कृती आणि पर्यटन मंत्री गजेंद्र सिंह शेखावत यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'एक्स'वरून ही माहिती दिली. भारतीय संस्कृतीचा समृद्ध वारसा, ऐतिहासिक संशोधनाची परंपरा, तत्त्वज्ञान आणि राज्यकारभारविषयक ज्ञानाला मिळालेली ही महत्त्वपूर्ण जागतिक मान्यता असल्याचे त्यांनी म्हटले आहे. या तीन ग्रंथांच्या नामांकनाची प्रक्रिया इंदिरा गांधी राष्ट्रीय कला केंद्राने महत्त्वपूर्ण भूमिका बजावत पूर्ण केली होती.

या तीनही ग्रंथांची हस्तलिखिते ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाची आहेत. महाभारताचे सुमारे ४०० वर्षे जुने भूर्जपत्रावरील हस्तलिखित पुण्यातील भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्थेत जतन केले आहे. शारदा लिपीतील या हस्तलिखिताचा संशोधनासाठी उपयोग होतो. कौटिल्य अर्थशास्त्राचे १६व्या शतकातील ताडपत्रावरील हस्तलिखित म्हैसूरच्या ओरिएंटल रिसर्च इन्स्टिट्यूटमध्ये आहे. यात राज्यकारभार, अर्थव्यवस्था, प्रशासन आणि युद्धनीतीची माहिती आहे. तर कल्हण यांनी १२व्या शतकात संस्कृतमध्ये लिहिलेली राजतरंगिणी काश्मीरचा इतिहास आणि तत्कालीन सामाजिक-राजकीय घडामोडींवर प्रकाश टाकते.